सकाळ
सिंधुदुर्ग, सोमवार,
१९ जानेवारी २०१५
२

# खाद्य महोत्सव स्पर्धेत तळणकर प्रथम

दोडामार्ग, ता. १८ : येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात खाद्य महोत्सव स्पर्धेत छाया तळणकरने प्रथम क्रमांक पटकाविला. द्वितीय इशा गणपत बर्वे, (गाजर हलवा), तर तृतीय क्रमांक निकीता विश्वनाथ नाईकने (खरवस) पटकाविला. स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून नवनिर्माण शिक्षण संस्थेचे सदस्य सूर्यकांत परमेकर, स्थानिक नियामक समितीचे सदस्य विवेकानंद नाईक उपस्थित होते. परीक्षक म्हणून सौ. स्मीता फातर्पेकर व सौ. मेघा जोशी उपस्थित होत्या. या वेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. शिवानी गवस (धोंडस), श्वेता धर्णे (व्हेज पुलाव), रुची नेवरेकर (आंबोली) यांना उत्तेजनार्थ घोषित करण्यात आले. स्पर्धेत विद्यार्थीनीबरोबरच विद्यार्थ्यांनीही सहभाग घेतला. विजेत्यांचे प्राचार्यांनी अभिनंदन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. डी. आर. एस. इंगळे, एस. एस. पाडगावकर, सौ. किरण नाईक, प्रा. एस. एन. खडपकर व इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.